**<u>नियमित दिवाणी दावा क्र. २०/२०१३ नि. २१ वर आदेश</u>**

प्रस्तुतचा अर्ज हा वादीचे अर्ज निशाणी क्र. २१ वाचला. दोन्ही बाजूचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले.

२. वादीचे वकील श्री. संतोष पालांडे यांनी असा युक्तीवाद केला की, प्र. वादी क्र. ३ श्री. दशरथ सखाराम दासगांवकर हे दि. २३/०२/२००२ रोजी मयत झाले असून त्यांच्या मृत्यूचा दाखला नुकताच मिळालेला आहे. प्रतिवादी क्र. ३ हयाचा विवाह झाला नसून त्यांस कोणीही वारस नाहीत. सबब प्रतिवादी क्र. ३ चे नांव प्रतिवादी पणातून काढून टाकण्यासाठी व प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यासाठी झालेला विलांब माफ करण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज निशाणी क्र. २१ कडे दाखल केलेला आहे.

३. प्रतिवादीचे वकील श्री. आर. एम. गांधी यांनी असा युक्तीवाद केला की, वादीला दाव्यांतील कोण प्रतिवादी जिवंत आहे व मयत झालेला आहे त्याची माहिती नसताना प्रस्तुतचा दावा दाखल केलेला आहे व जाणून बूजून खोटेपणाने चुकीच्या व्यक्तींचा उल्लेख करून दावा दाखल केलेला आहे. सबब वादीचा अर्ज फेटाळण्यांत यांवा.

४. प्रतिवादीने निशाणी क्र. २० कडे प्रतिवादी क्र. ३ दशरथ सखाराम दासगांवकर यांच्या मृत्यूचा दाखला बृहमुंबई महानगर पालिकेने दि. १२/०४/२००२ रोजीचा दाखल केलेला आहे. त्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, दशरथ सखाराख दासगांवकर हयाचा मृत्यू दिनांक २३/०३/२००२ रोजी झाल्याचे दिसून येते. सबब प्रस्तुतच्या दाव्यांतून प्रतिवादी क्र. ३ चे नांव काढून टाकणे योग्य ठरते. सबब प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यांत येतो व प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यासाठी झालेला विलंब माफ करण्यांत येतो.

**<u>आदेश</u>**

१. अर्जदाराचा अर्ज निशाणी क्र. २१ मंजूर करण्यांत येत आहे.

२. अर्जदारास याद्वारे असे आदेशित करण्यांत येते की, त्यांनी प्रतिवादी क्र. ३ चे नांव दाव्यामधून काढून टाकावे व तशी दाव्याच्या वादपत्रामध्ये आवश्यक ती दुरूस्ती करून दुरूस्त वादपत्र पुढील तारखेपर्यत दाखल करावें.

३. प्रस्तुत अर्जाचा खर्च हा दाव्यांच्या खर्चात राहील.

ठिकाण : महाड (वि. रा. डोईफोडे)
दिनांक : २२/०१/२०१८ सह दि. न्या. क. स्तर, महाड